नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/१०/२०२६ (बुधवार)

गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या ०२ आरोपींना अटक
२८ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एन.एम. सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री लसंते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्या नेतृत्वात मौदा पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण १५ लाख रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींना अटक केले आहे.**

दिनांक २८/१०/२०२६ रोजी मौदा पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी माथनी शिवारातील टोल नाका येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान आयसर गाडी क्र. सी.जी—०४/पी. ई—६५८२ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **१) पिंटु रामकिशन मेहरा, वय ३२ वर्ष, रा. वृंदावन कॉलनी, इंदोर (म.प्र.), ह.मु. रायपुर छत्तीसगड २) मो. अली इरशाद अहमद, वय २४ वर्ष, रा. कामगार नगर, कमर कॉलनी नागपूर दोन्ही रा. कळमना नागपूर** हे मिळुन आले. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **२८ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून आयसर गाडी क्र. सी.जी—०४/पी. ई—६५८२ किंमती १२,००,०००/— रूपये आणि २८ गोवंश जनावरे किंमती २,८०,०००/— रूपये, ०२ ॲंडरॉईड मोबाईल असा एकुण किंमती १५,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी ही दोन्ही आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ११(१), (ड), (ई), (फ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), (१), ९ महा. पशु सरक्षण अधि १९७६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे.



क्रिकेट सट्टा / बेटिंग लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद
स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रमाण यांची कामगिरी

दिनांक २६/१०/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरिष्ठ पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण आणि अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी ,स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने **भारत विरूध्द न्यूझीलंड टी २० किक्रेट सामन्या दरम्यान** क्रिकेट सट्टा/ बेटिंग जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई केली.

दिनांक २७/१०/२०२६ रोजी **मौजा अंबेडकर पुतळयासमोर नगर परीषद कॉम्प्लेक्स काटोल** ऑनलाईन ॲप्लीकेशन आयडी चा वापर करून **भारत विरूध्द न्यूझीलंड टी २० किक्रेट सामन्या दरम्यान** क्रिकेट सट्टा/ बेटिंग जुगार खेळवणाऱ्या **१) धनंजय मारोतराव डाखोळे, वय ३२ वर्ष, रा. सावळी लींगा, ता. काटोल जि. नागपूर २) सजल सुरेश सोमकुवर, वय २३ वर्षे, रा. अर्जुननगर, काटोल, ता. काटोल जि. नागपूर** यांना ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातुन ॲड्रॉईड मोबाईल किंमती १२,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ अ मजुका सहकलम ४९ भा न्या संहीता अन्वये **पोलीस स्टेशन काटोल** येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

पोलीस स्टेशन पाचगाव :— पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पाचगाव यांनी पाचगवा येथील वाचानालय तसेच लांजाळा तसेच खलासांना येथे भेट देऊन

उपस्थितीतांना सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास महिला, युवक वर्ग उपस्थित होते.

पोलीस स्टेशन खापा :— पोलीस उपनिरीक्षक श्री. राठोड, पोलीस स्टेशन खापा यांनी जवाहर विद्यालय खापा येथील विद्यार्थी व शिक्षक यांना सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

पोलीस स्टेशन उमरेड :— पोलीस निरीक्षक श्री. धनाजी जळक, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरेड यांनी उमरेड येथे मंगळवारी झोपडपट्टी येथील तरुण पुरुष व महिला यांना सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

पोलीस स्टेशन वेलतूर :— पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वेलतूर यांनी वेलतूर येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालय शिर्सी पुनर्वसन येथे सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक, तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.




UDISE No.27031204202
स्व.यशवंतराव चव्हाण
माध्यमिक विद्यालय
सिर्सी (जने)
त.कुही, जि.नागपूर.
महाराष्ट्र पोलीस
नागपूर ग्रामीण पोलीस
सायबर
जागृती अभियान



पोस्टे काटोल हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद

पोलीस स्टेशन काटोल :— दिनांक २७/१०/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा तार बाजार काटोल येथे आरोपी १) नंदु रामकृष्णजी लोणारे, वय ४२ वर्ष, रा. मुर्ती रोड काटोल २) धनराज रामेश्वर गजाम, वय ३५ वर्ष, रा. जेउरवाडा, ता. कारंजा, जि. वर्धा ह. मु. खंडाळा काटोल हे काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे काटोल पोलीस घटनास्थळी पोहचले असता तार बाजार काटोल येथे **आरोपी क्रं. १) नंदु रामकृष्णजी लोणारे, वय ४२ वर्ष, रा. मुर्ती रोड काटोल २) धनराज रामेश्वर गजाम, वय ३५ वर्ष, रा. जेउरवाडा, ता. कारंजा, जि. वर्धा ह. मु. खंडाळा काटोल** हे कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आले.

पोलीसांनी घटनास्थळावरून दोन्ही गुन्हयातील रोख रक्कम ६९०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य असा एकुण ७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **नमुद आरोपी यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

दिनांक २७/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन सावनेर, कळमेश्वर येथे अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये खालील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत आरोपी निशांत प्रतीकलाल बुनकर, वय ३० वर्ष, रा. शक्ती नगर वाघोडा, ता. सावनेर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी १) बबलु बुध्द शाहु, वय ४० वर्ष, रा. चनकापुर खापरखेडा, ह. मु. नितेश सतलेजा यांचे शेत फॉर्म हाउस ता. कळमेश्वर २) नितेश सलेजा, रा. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १८ गुन्हे दाखल,

दिनांक २७/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १८ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपी १) सुखदेव गौतम बागडे, वय ६५ वर्ष, रा. वार्ड नं. २, मंगसा ता. सावनेर जि. नागपूर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन खापा आरोपी १.** विशाल दिवाकर जुनघरे, वय २९ वर्ष, रा. नवीन वस्ती खापा, ता. सावनेर, जि. नागपूर २. प्रविन हरी सुरजुसे, वय ३० वर्ष, रा. डोंगेघाट खापा, ता. सावनेर, जि. नागपूर ३. मंगेश सुरेश मेश्राम, वय ३३ वर्ष, रा. खुबाळा, ता. सावनेर, जि. नागपूर ४. रोशन सुरेश धुर्वे, वय ३० वर्ष, रा. मोहगाव, ता. सावनेर, जि. नागपूर ५. संजय शिवपद मंडल, वय ४६ वर्ष, रा. हिरापुर नं. २, बैतुल ह.मु. उमरी, ता. सावनेर, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे गुलाब भैययाजी कोल्हे, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, बोरगाव बु ता. कळमेश्वर

याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे १. दिलदारसिंग मायासिंग भादा, वय ४४ वर्षे, रा. सरदार मोहल्ला, गजानन मंदीर मागे कळमेश्वर, ता. कळमेश्वर २. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी नामे रविंद्र पुंडलिंक पाटील, वय ५५ वर्ष, रा. कोहळी वार्ड क्र. ०१ याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे सुरज राजु पौनीकर, वय २१ वर्ष, रा. जोगीठाणापेठ उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी गणेश जानरावजी उईके, वय ४५ वर्ष, रा. ऑरेंज प्लाझा चे मागे काटोल ता. काटोल जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी १. दिनेश माणिकराव सलामे, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र १७, नरखेड २. दिनेश शंकरराव बालपांडे, वय ५२ वर्ष, रा. वार्ड क्र १४, नरखेड यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी अरविंद राजु अलोसियत, वय ४० वर्ष, रा. पादरी ठाणा, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी १. मोरेश्वर नारायण पराते, वय ५८ वर्षे, रा. सिर्सी, ता. उमरेड, जि. नागपुर २. संजय रतीराम मरकाम, वय ४२ वर्षे, रा. रामा कॉलोनी ता. जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण १००८० मिली देशी दारू, ९० लिटर मोहाफुल दारू असा एकुण १३,४८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर